# सहसंचालक, तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय,

**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७९२४०

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७७९१३

महत्वाचे/कालमर्यादीत

क्रमांक:विकाअ/आस्था/बदली/२०१५/ २१५
दिनांक : २८/१/२०१५

प्रति,

प्राचार्य,
~~शा.अभियांत्रीकी महा.,अमरावती.~~
शासकीय तंत्रनिकेतन,अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशीम/मुर्तीजापुर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन,यवतमाळ

विषय: नियमीत शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्याबाबत
संदर्भ : संचालनालयाचे पत्र क.४अ/आस्था/नियमीत अध्यापकांच्या बदल्या/२०१५-१६/३१ दि.२३.१.२०१५

उपरोक्त विषयानुसार कळविवण्यात येते की, आपले अधिनस्त कार्यरत प्राचार्य,विभाग प्रमुख,अधिव्याख्याता यांच्या नियतकालीक बदल्याबाबतची माहिती सोबतच्या प्रपत्रानुसार आवश्यक ती माहिती DVT-TTNatraj या फॉन्टमध्ये New Microsoft Excel Worksheet मध्ये भरुन या कार्यालयास संबंधीत कर्मचारी यांचे मार्फत हस्तदेय स्वॉप्ट कॉपीसह दिनांक ३१.१.२०१५ पुर्वी सादर करण्यात यावी. स्मरणपत्र किंवा दुरध्वनीची वाट न पाहता माहिती विनाविलंब पाठवावी. सोबत संदभीय पत्राची प्रत जोडली आहे.

सहपत्र: वरिलप्रमाणे

S.P Pasebant
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

D:est2013/est

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3,, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 2620601, 2690602, 2641150/51, फॅक्स - 2692102.

तार - edutech E-mail : desk4a@dte.org.in Internet :http//www.dte.org.in


कालमर्यादा

क्र:4अ/आस्था/नियमित अध्यापकांच्या बदल्या/2015-16/31

दिनांक: 23 JAN 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद/
अमरावती / नागपूर.

**विषय : नियमित शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्याबाबतत.**

संदर्भ : शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पांडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्याकरीता सन 2005 च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -21

शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्याबाबत संदर्भीन अधिनियमान्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार दिनांक 31 मे 2015 रोजी एकाच पदावर किंवा एकापेक्षा जास्त पदावर किंवा एकापेक्षा जास्त पदांवर एकाच ठिकाणी 3 वर्ष सेवा पूर्ण करणारे प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांचे नाव आद्याक्षरात न लिहिता संपूर्ण नाव नमूद करून माहिती सोबतच्या विहित प्रपत्र अ, ब, क मध्ये खालील सूचना विचारात घेऊन सादर करावी.

1) प्रशासकीय बदलीसाठी संबंधीतांना वैयक्तिक पसंतीची 3 ठिकाणे कळविण्याची सूचना देऊन त्याचप्रमाणे माहिती सादर करण्यांत यावी. मात्र ज्या प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता यांनी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे दिली नाहीत किंवा तीन पेक्षा कमी ठिकाणे नमूद केलीत त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने त्या शिवाय अन्यत्र करण्यांत येईल याची त्यांना जाणीव करून द्यावी.
2) ज्या अध्यापकांनी विनंती बदलीसाठी अर्ज केले आहेत अशा अध्यापकांची माहिती व त्यांचे विनंती बदली अर्ज सहपत्रासह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करण्यांत यावेत. तसेच ज्या प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची त्यांचे जवळचे नातेवाईकांचे आजारपण व त्यांचे स्वत:चे आजारपणासाठी बदलीची विनंती केली असेल अशा प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची विनंती बदली अर्जासोबत पर्याप्त वैद्यकीय कागदपत्रे पुरावा म्हणून देणे आवश्यक असून केवळ एका प्रमाणपत्राचे आधारे विनंती बदली विचारात घेतली जाणार नाही. त्याचप्रमाणे विनंती बदलीसाठी अर्ज प्राचार्य / विभागीय कार्यालयामार्फतच सादर करावेत. संचालनालयास थेट अर्ज सादर करू नये. संचालनालयास थेट अर्ज सादर केल्यास किंवा प्रस्तावाच्या विहित मुदतीनंतर स्वतंत्रपणे प्राप्त झालेला अर्ज विचारात न घेता सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यांत येतील असे संबंधितांना कळविण्यांत यावे. तसेच त्यापूर्वी 2014 मध्ये संचालनालयास सादर केलेल्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नसल्याची बाब संबंधितांच्या लक्षात आणून द्यावी.
3) आपल्या अंतर्गत येणा-या शासकीय तंत्रनिकेतन या संस्थेत कार्यरत असलेल्या अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांच्या शैक्षणिक संपादणुक अहवाल

प्रतिकुल आहेत अशा प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची नांवे सुध्दा कळवून त्यांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे ? याबाबत आपले स्पष्ट मत / अभिप्राय आवश्यक त्या कागदपत्रासहीत (पुराव्यासह ) कळविण्यांत यावीत.

4) असे निर्देशनास आले आहे की, संस्थाप्रमुखांनी शिफारशीसह सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने बदल्याबाबत निर्णय घेतल्यानंतर बदली केलेल्या काही प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची बदली रद्द करण्याबाबत संस्थाप्रमुखांकडून विनंती करण्यांत येते. म्हणून याबाबत आपणांस सूचित करण्यांत येते की, संदर्भीय बदल्यांच्या कायद्याचे अवलोकन करून बदली पात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची बदली करावयाची नसल्यास त्यांचे ठोस समर्थन आवश्यक त्या कागदपत्रासहीत देऊन तशी शिफारस करण्यांत यावी. याबाबत बदल्या झाल्यानंतर आपल्याकडून कोणतीही शिफारस आल्यास विचारात घेतली जाणार नाही.

5) बदलीपात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची पाल्य शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये 10 वी किंवा 12 वीत शिकत असल्याचे कारणास्तव एक वर्षासाठी बदली न करण्याची शिफारस असल्यास तसे स्पष्टपणे नमूद करून त्याबाबतची कागदपत्रे प्रस्तावासोबत पुराव्याकरीता जोडावीत.

6) जे बदलीपात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता नजिकच्या कालावधीत डिसेंबर 2016 पूर्वी सेवानिवृत्त होत आहेत अशा अध्यापकांच्या नावांसमोर ठळक अक्षरात अभिप्राय देण्यांत यावा.

7) जे प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर प्रचलित शासन नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यांत येईल तसेच सदर बाब वार्षिक गोपनिय अहवालात नमूद करण्यांत येईल ही बाब आपल्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतील प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांच्या निदर्शनास आणावी.

8) संदर्भीन अधिनियमात दिलेल्या सर्व तरतूदी विचारात घेऊन त्या अनुषंगाने बदल्याची माहिती दिल्याचे तसेच सोबतच्या विवरणपत्रातील माहिती अचूक व सत्य असल्याचे आपण प्रमाणित करून घ्यावी.

9) जे अध्यापक इतर आस्थापनेवर सेवा- विस्तृतीने कार्यरत आहेत त्या सर्व अध्यापकांची माहिती मुळ आस्थापनेवरून सादर करावी.

आपल्या अंतर्गत येणा-या शासकीय तंत्रनिकेतनातील नियमित नियुक्तीने कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांची माहिती सोबतच्या प्रपत्र क मध्ये विद्याशाखानिहाय व सेवाज्येष्ठतेनुसार ( बदल्यांच्या प्रस्ताव कालावधी नुसार सादर करावा. ) प्रपत्र अ, ब व क मधील माहिती DVT-TTNatraj या फॉन्ट मध्ये New Microsoft Excel Worksheet या नमुन्यातील विहित प्रपत्रात संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दिनांक 15 फेब्रुवारी 2015 पूर्वी निश्चितपणे पाठविण्याची कार्यवाही करावी. तसेच एक प्रत या संचालनालयाच्या dtedesk4a@gmail.com या ई-मेल पत्त्यावर सुध्दा पाठविण्यात यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : सचिव, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना कळविण्यात येते की, त्यांच्या आस्थापनेरील तदर्थ व्यवस्थेने गट अ संवर्गातील प्रशासकीय पदांवर कार्यरत असलेल्या विभागप्रमुख व अधिव्याख्यात्यांची माहिती वरील सूचना विचारात घेऊन दिनांक 15 फेब्रुवारी 2015 पूर्वी सोबतच्या प्रपत्रात सादर करावी.

\\DTENS1\desk4a\Priya\Niyatkalik Transfer 2015 circular.docx

विवरणपत्र **अ**

शिक्षकीय तदर्थ व्यवस्थेने प्रशासकीय पदावर 3 ( तीन ) वर्षापेक्षा जास्त कालावधी कार्यरत अध्यापकांच्या प्रशासकीय व विनंती बदलीसाठी

( प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची माहिती )

| अ. क्र. | शासकीय सेवकाचे संपूर्ण नाव | पदनाम | विद्या शाखा | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्ती चा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नांव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | रकाना क्र. 7 पैकी अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी (दि. 31 मे 2015 रोजी वर्ष , महिने ) | प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तिक पसंतीची तीन (3) ठिकाणे | विनंती बदलसाठी पसंतीची तीन (3) ठिकाणे | विनंती बदलीसाठी तपशीलवार कारण व . त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इ. अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन 2006 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 21 मधील तरतूदींच्या अनुषंगाने संस्थाप्रमुख / सहसंचालकांची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |

| विविध पदांवर विविध ठिकाणी केलेल्या सेवेचा तपशील | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| संस्था / कार्यालय | पदनाम | पासून | पर्यंत | एकूण सेवाकाळ | |
| 17 | | | | | |

संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का

सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का

\\DTENS1\desk4a\Priya\Niyatkalik Transfer 2015 circular.docx

# विवरणपत्र ब

शिक्षकीय तदर्थ व्यवस्थेने प्रशासकीय पदावर 3 ( तीन ) वर्षापेक्षा कमी कालावधी कार्यरत अध्यापकांच्या विनंती / मान्यवरांच्या शिफारशीसह माहिती
( प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची माहिती )

| अ. क्र. | शासकीय सेवकाचे संपूर्ण नाव | पदनाम | विद्या शाखा | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्ती चा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नांव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | रकाना क्र. 7 पैकी अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी (दि. 31 मे 2015 रोजी वर्ष , महिने ) | विनंती बदलसाठी पसंतीची तीन (3) ठिकाणे | विनंती बदलीसाठी तपशीलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे | सन 2006 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 21 मधील तरतूदींच्या अनुषंगाने संस्थाप्रमुख / सहसंचालकांची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| | | | | | | | | | | | | | |

| विविध पदांवर विविध ठिकाणी केलेल्या सेवेचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| संस्था / कार्यालय | पदनाम | पासून | पर्यंत | एकूण सेवाकाळ |
| 15 | | | | |

संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का

~~सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का~~

विवरणपत्र - क

## संस्थेतील सर्व कार्यरत अध्यापकांची सविस्तर माहिती

| अ. क्र. | शासकीय सेवकाचे संपूर्ण नाव | पदनाम | विद्या शाखा | पे बँड | एजीपी | जन्म तारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा दिनांक व नियुक्तीचा प्रकार | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी | रकाना क्र. 11 पैकी विनंती वरून अन्यत्र प्रतिनियुक्ती चा कालावधी | कार्यरत असलेल्या विविध पदावर वापूर्वी विविध संस्थेतील संस्था निहाय सेवाकाळ पदनाम / संस्था / कार्यालय | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | संस्थेचे नाव | पदनाम | पासून | पर्यंत | एकूण सेवाकाळ |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का

सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का

\\DTENS1\desk4a\Priya\Niyatkalik Transfer 2015 circular.docx